सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**विधि व न्याय विभाग**

सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६

# महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ अधिनियम, २०१४

**( दिनांक २६ जानेवारी, २०१६ पर्यंत सुधारित)**

MAHARASHTRA ACT NO. VI OF 2014

# Maharashtra National Law University Act, 2014

*(As modified upto the 26th January, 2016)*

व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे यांनी भारतात मुद्रित केले आणि संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री व प्रकाशने, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ००४ यांनी प्रकाशित केले.

**२०१५**

**[ किंमत रु.    ]**

## (सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६)

# महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ अधिनियम, २०१४

### अनुक्रमणिका


| कलमे | | | पृष्ठे |
|---|---|---|---|
| प्रास्ताविक | | | |
| १. | संक्षिप्त नाव व प्रारंभ. | .. | ०१ |
| २. | व्याख्या. | .. | ०१ |
| ३. | विद्यापीठाची स्थापना व त्यांचे विधिद्वारे संस्थापन. | .. | ०२ |
| ४. | विद्यापीठाची उद्दिष्ट्ये | .. | ०२ |
| ५. | विद्यापीठ सर्वांसाठी खुले असणे. | .. | ०३ |
| ६. | विद्यापीठाने आरक्षण, इत्यादिंच्या संबंधात शासनाच्या धोरणाचे अनुसरण करणे. | .. | ०३ |
| ७. | विद्यापीठाचे अधिकार व कार्ये. | .. | ०३ |
| ८. | विद्यापीठातील अध्यापन. | .. | ०६ |
| ९. | विद्यापीठाचे कुलपती. | .. | ०६ |
| १०. | विद्यापीठाची प्राधिकरणे. | .. | ०६ |
| ११. | महापरिषद. | .. | ०६ |
| १२. | महापरिषदेच्या सदस्यांचा पदावधी. | .. | ०७ |
| १३. | महापरिषदेचे अधिकार व कार्ये. | .. | ०८ |
| १४. | महापरिषदेच्या बैठका. | .. | ०८ |
| १५. | कार्यकारी परिषद. | .. | ०९ |
| १६. | कार्यकारी परिषदेचा पदावधी. | .. | ०९ |
| १७. | कार्यकारी परिषदेचे अधिकार व कार्ये. | .. | १० |
| १८. | कार्यकारी परिषदेच्या बैठका. | .. | ११ |

## **अनुक्रमणिका**--चालू


| **कलमे** | | | **पृष्ठे** |
|---|---|---|---|
| १९. | स्थायी समिती घटित करणे व कार्यकारी परिषदेने तदर्थ समित्या नेमणे. | .. | ११ |
| २०. | कार्यकारी परिषदेने अधिकार सोपवणे. | .. | १२ |
| २१. | विद्यापरिषद. | .. | १२ |
| २२. | विद्यापरिषदेची रचना. | .. | १२ |
| २३. | विद्यापरिषदेचे अधिकार व कार्ये. | .. | १२ |
| २४. | विद्यापरिषदेच्या बैठकांची कार्यपद्धती. | .. | १३ |
| २५. | वित्त समिती. | .. | १४ |
| २६. | निवड समित्या. | .. | १५ |
| २७. | विद्यापीठाचे अधिकारी. | .. | १५ |
| २८. | कुलगुरु. | .. | १६ |
| २९. | कुलसचिव. | .. | १६ |
| ३०. | विभागप्रमुख | .. | १६ |
| ३१. | वित्त व लेखा अधिकारी. | .. | १६ |
| ३२. | इतर अधिकारी व कर्मचारी | .. | १६ |
| ३३. | भविष्यनिर्वाह निधी, उपदाने व इतर लाभ. | .. | १७ |
| ३४. | विद्यापीठ निधी. | .. | १७ |
| ३५. | वार्षिक लेखे व लेखापरीक्षा. | .. | १७ |
| ३६. | वित्तीय अंदाज. | .. | १८ |
| ३७. | वार्षिक अहवाल. | .. | १८ |

## अनुक्रमणिका--चालू


| कलमे | | | पृष्ठे |
|---|---|---|---|
| ३८. | संविदा निष्पादित करणे. | .. | १८ |
| ३९. | विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी पात्रता. | .. | १८ |
| ४०. | विद्यार्थ्यांचा निवास. | .. | १८ |
| ४१. | सन्मान्य पदवी. | .. | १८ |
| ४२. | पदवी किंवा पदविका काढून घेणे. | .. | १८ |
| ४३. | शिस्त. | .. | १९ |
| ४४. | विनियम. | .. | १९ |
| ४५. | विद्यापीठ पुनर्विलोकन आयोग नियुक्त करणे. | .. | २० |
| ४६. | केवळ रचनेमधील दोष, रिक्त पद इत्यादी कारणांमुळे कार्यवाही विधिअग्राह्य न होणे. | .. | २० |
| ४७. | सुरूवातीच्या अडचणी दूर करणे. | .. | २० |
| ४८. | संक्रमणकालीन तरतुदी. | .. | २१ |
| ४९. | संरक्षण. | .. | २१ |
| ५०. | अधिनियमाचा अधिभावी परिणाम असणे. | .. | २१ |
| ५१. | पुरस्कृत योजना. | .. | २१ |
| ५२. | अडचणी दूर करण्याचा अधिकार. | .. | २१ |
| ५३. | सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५ याचे निरसन व व्यावृत्ती. | .. | २२ |
| | **अनुसूची—** | .. | २२ |

## [सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६.]

# महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ अधिनियम, २०१४.

[ मा. **राज्यपालांची** संमती मिळाल्यानंतर **" महाराष्ट्र शासन राजपत्रात "** दिनांक २० मार्च २०१४ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.]

**विधिविषयक शिक्षणाचा विकास व अभिवृद्धी करण्याकरिता आणि विधि पद्धतीमध्ये विशेष व पद्धतशीर शिक्षण, प्रशिक्षण देणे व संशोधन करणे या प्रयोजनांकरिता राज्यात राष्ट्रीय विधि विद्यापीठांची स्थापना करणे व त्यांचे विधिद्वारे संस्थापन करणे याकरिता आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

**आणि त्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, विधिविषयक शिक्षणाचा विकास व अभिवृद्धी करण्याकरिता आणि विधि पद्धतीमध्ये विशेष व पद्धतशीर शिक्षण, प्रशिक्षण देणे व संशोधन करणे आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींसाठी राज्यात राष्ट्रीय विधि विद्यापीठांची स्थापना करणे व त्यांचे विधिद्वारे संस्थापन करणे यांकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तातडीने कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि म्हणून, त्यांनी दिनांक १८ फेब्रुवारी २०१४ रोजी महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ अध्यादेश, २०१४ हा प्रख्यापित केला होता ; २०१४ चा महा. अध्या. ५.

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या पासष्टाव्या वर्षी, याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ. **१.** (१) या अधिनियमास, "महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ अधिनियम, २०१४" असे म्हणावे.

(२) तो, दिनांक १८ फेब्रुवारी २०१४ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

व्याख्या. **२.** या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) "विद्यापरिषद" याचा अर्थ, कलम २१ मध्ये निर्देशित केलेली विद्यापीठाची विद्यापरिषद, असा आहे;

(ख) "भारतीय वकील परिषद" याचा अर्थ, अधिवक्ता अधिनियम, १९६१ अन्वये घटित केलेली भारतीय वकील परिषद, असा आहे ; १९६१ चा २५.

(ग) "कुलपती" याचा अर्थ, विद्यापीठाचा कुलपती, असा आहे ;

(घ) "कार्यकारी परिषद" याचा अर्थ, कलम १५ मध्ये निर्देशित केलेली विद्यापीठाची कार्यकारी परिषद, असा आहे ;

(ङ) "वित्त समिती" याचा अर्थ, कलम २५ मध्ये निर्देशित केलेली विद्यापीठाची वित्त समिती, असा आहे ;

(च) "महापरिषद" याचा अर्थ, कलम ११ मध्ये निर्देशित केलेली विद्यापीठाची महापरिषद, असा आहे ;

(छ) "कुलसचिव" याचा अर्थ, कलम २९ मध्ये निर्देशित केलेला विद्यापीठाचा कुलसचिव, असा आहे ;

(ज) "विनियम" याचा अर्थ, कलम ४४ अन्वये केलेले विद्यापीठाचे विनियम, असा आहे ;

(झ) "अनुसूची'' याचा अर्थ, या अधिनियमासोबत जोडलेली अनुसूची, असा आहे ;

(ञ) "राज्य शासन'' याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(ट) "अध्यापक'' यामध्ये प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहायक प्राध्यापक, प्रपाठक, अधिव्याख्याता व विद्यापीठामध्ये शिक्षण देणारी अन्य कोणतीही व्यक्ती यांचा समावेश होतो ;

(ठ) "विद्यापीठ'' याचा अर्थ, अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेले महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ, असा आहे.

;

(ड) "विद्यापीठ अनुदान आयोग'' याचा अर्थ, विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम, १९५६ अन्वये स्थापित करण्यात आलेला विद्यापीठ अनुदान आयोग, असा आहे; १९५६ चा ३.

(ढ) "कुलगुरु'' याचा अर्थ, विद्यापीठाचा कुलगुरु, असा आहे.

विद्यापीठांची स्थापना व त्यांचे विधिद्वारे संस्थापन.

**३.** (१) राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकापासून, अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे नाव व मुख्यालय असलेल्या विद्यापीठांची स्थापना करण्यात येईल :

परंतु, वेगवेगळ्या विद्यापीठांची स्थापना करण्याकरिता वेगवेगळे दिनांक नियत करता येतील.

(२) राज्य शासनाला, वेळोवेळी, या अधिनियमांतर्गत **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, त्यामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा नावाने, अशा ठिकाणी व अशा दिनांकापासून, अशा अधिसूचनेद्वारे अनुसूचीमध्ये आवश्यक त्या नोंदी दाखल करून कोणतेही नवीन विद्यापीठ घटित करता येईल आणि अशा अधिसूचनेद्वारे उक्त अनुसूचीमध्ये सुधारणा करण्याकरिता आवश्यक त्या नोंदीसुद्धा दाखल करता येतील आणि त्यानुसार अनुसूचीमध्ये सुधारणा झाल्याचे मानण्यात येईल :

परंतु, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी ठराव संमत केल्याखेरीज, अशी कोणतीही अधिसूचना काढण्यात येणार नाही.

(३) प्रत्येक विद्यापीठ हे, कुलपती, कुलगुरु, महापरिषद, कार्यकारी परिषद, विद्यापरिषद व कुलसचिव यांचे मिळून बनलेले असेल.

(४) अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेले प्रत्येक विद्यापीठ हे, नाव, अखंड परंपरा व समाईक मोहोर असलेला एक निगम निकाय असेल, त्याला या अधिनियमाच्या तरतुदींना अधीन राहून, जंगम व स्थावर अशी दोन्ही प्रकारची मालमत्ता संपादन करण्याचा व ती धारण करण्याचा, आणि संविदा करण्याचा अधिकार असेल, आणि त्याला किंवा त्याच्याविरुद्ध उक्त नावाने दावा दाखल करता येईल.

(५) विद्यापीठाकडून किंवा विद्यापीठाच्या विरुद्ध दाखल केलेले सर्व दावे व इतर कायदेशीर कार्यवाही यांमधील वादकथने कुलगुरुकडून स्वाक्षरी करून सत्यापित करण्यात येतील आणि असे सर्व दावे व कार्यवाही यांमधील सर्व आदेशिका काढून त्या कुलगुरुवर बजावण्यात येतील.

(६) पोट-कलम (२) मध्ये निर्देशित केलेल्या विद्यापीठाचे मुख्यालय हे, राज्य शासन **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, विनिर्दिष्ट करेल अशा ठिकाणी असेल.

**४.** कायदा आणि कायदेशीर प्रक्रिया यांचे अध्ययन व ज्ञान यांचा प्रचार व प्रसार करणे आणि राष्ट्रीय विकासामध्ये आपली भूमिका अभिव्यक्त करणे, विधि सेवा, विधिविधान, विधि सुधारणा व यांसारख्या बाबींमध्ये कौशल्य विकसित करून कायद्याच्या क्षेत्रात समाजसेवा करण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये आणि संशोधन विद्याव्यासंगीमध्ये जबाबदारीची जाणीव विकसित करणे, व्याख्याने, चर्चासत्रे, परिसंवाद व परिषदा आयोजित करणे, कायदेविषयक विद्यापीठाची उद्दिष्टे.

ज्ञानाला चालना देणे व सामाजिक विकासाचे साधन म्हणून कार्यक्षम कायदा व कायदेशीर प्रक्रिया तयार करणे, परीक्षा घेणे व पदव्या व इतर विद्याविषयक विशेषोपाधी प्रदान करणे व विद्यापीठाची सर्व किंवा कोणतीही उद्दिष्ट्ये पूर्ण करण्यासाठी आनुषंगिक, आवश्यक किंवा हितावह असतील अशा सर्व गोष्टी करणे, ही विद्यापीठाची उद्दिष्ट्ये असतील.

विद्यापीठ सर्वांसाठी खुले असणे.

**५.** भारताच्या कोणत्याही नागरिकास, लिंग भेद, वंश, पंथ, वर्ग, जात, जन्मस्थान, धर्मश्रद्धा किंवा व्यवसाय किंवा राजकीय किंवा इतर मतप्रणाली केवळ या कारणावरून विद्यापीठाच्या कोणत्याही पदापासून किंवा त्याची प्राधिकरणे, मंडळे किंवा समित्या यांपैकी कोणत्याही प्राधिकरणाचे सदस्यत्व मिळण्यापासून, किंवा कोणत्याही पदावरील नेमणुकीपासून, किंवा कोणतीही पदवी, पदविका, प्रमाणपत्र किंवा इतर विद्याविषयक विशेषोपाधी किंवा अभ्यास पाठ्यक्रमासाठी प्रवेश मिळविण्यापासून, वंचित करता येणार नाही. अध्यापक किंवा विद्यार्थी म्हणून त्यात दाखल होण्यास किंवा त्यात कोणतेही पद धारण करण्यास किंवा त्या ठिकाणी स्नातक होण्यास किंवा त्यांच्या कोणत्याही विशेषाधिकारांचा लाभ घेण्यास किंवा त्याचा वापर करण्यास त्यास हक्कदार होण्यासाठी धर्मश्रद्धा किंवा व्यवसाय यांपैकी कोणतीही परीक्षा कोणत्याही व्यक्तीवर लादणे हे विद्यापीठाला कायदेशीर असणार नाही.

विद्यापीठाने आरक्षण, इत्यादींच्या संबंधात शासनाच्या धोरणाचे अनुसरण करणे.

**६.** (१) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागासवर्ग यांसाठी अध्यापक व अध्यापकेतर अधिकारी व कर्मचारी यांच्या वेगवेगळ्या पदांवरील नियुक्त्यांच्या बाबतीत आरक्षण ठेवण्यासंबंधातील व विद्यार्थ्यांना प्रवेश आणि शुल्करचनेच्या प्रयोजनांकरिता, राज्य शासनाचे धोरण व शासनाने वेळोवेळी दिलेले आदेश यांचा विद्यापीठ अंगिकार करील.

(२) राज्य शासनाकडून वेळोवेळी निदेश देण्यात येईल त्यानुसार समाजातील विविध प्रवर्गातील दुर्बल घटकांच्या व अल्पसंख्यांकांच्या कल्याणासंबंधात राज्य शासनाच्या सर्वसाधारण धोरणाचा विद्यापीठ अंगिकार करील.

विद्यापीठाचे अधिकार व कार्ये.

**७.** विद्यापीठाचे अधिकार व कार्ये पुढीलप्रमाणे असतील,―

(एक) विद्यापीठ आणि त्याच्या उद्देशांची पूर्तता करण्याकरिता आवश्यक असतील अशी संशोधन, शिक्षण व निदेशन देणाऱ्या अशा केंद्रांचा कारभार पाहणे व त्यांचे व्यवस्थापन करणे ;

(दोन) विद्यापीठाला योग्य वाटतील अशा त्याप्रमाणे कायद्याशी संबंधित ज्ञान किंवा अध्ययनांच्या, अशा शाखांमध्ये शिक्षणासाठी तरतूद करणे आणि कायद्याच्या क्षेत्रामध्ये संशोधन करण्यासाठी आणि तद्‌विषयक ज्ञानवर्धनासाठी व ज्ञानप्रसारासाठी तरतूद करणे ;

(तीन) बहि:शाल अध्यापन व विस्तार सेवांची रचना करणे व ते हाती घेणे ;

(चार) परीक्षा घेणे व विद्यापीठ निर्धारित करील अशा शर्तींना अधीन राहून, व्यक्तींना पदविका किंवा प्रमाणपत्र देणे व पदव्या व इतर विद्याविषयक विशेषोपाधी प्रदान करणे आणि सबळ व पुरेशा कारणावरून अशा कोणत्याही पदविका, प्रमाणपत्रे, पदव्या किंवा इतर विद्याविषयक विशेषोपाधी काढून घेणे ;

(पाच) विनियमांमध्ये घालून दिलेल्या रीतीने सन्मान्य पदव्या किंवा इतर विशेषोपाधी प्रदान करणे ;

(सहा) विनियमांमध्ये निर्धारित करण्यात येईल असे शुल्क व इतर आकार निश्चित करणे, त्याची मागणी करणे व ते स्वीकारणे ;

(सात) सभागृहे व वसतिगृहे यांची उभारणी करणे व त्याची देखभाल करणे आणि विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांच्या निवासाच्या जागांना मान्यता देणे आणि अशा कोणत्याही निवासी जागांना देण्यात आलेली मान्यता काढून घेणे ;

(आठ) विद्यापीठाच्या मतानुसार, तिच्या उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी आवश्यक असलेली अशी विशेष केंद्रे, विशेषीकृत अभ्यास केंद्रे किंवा संशोधन व शिक्षण यांसाठी इतर युनिटे यांची स्थापना करणे ;

(नऊ) विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांच्या निवासस्थानाची देखरेख करणे व त्यावर नियंत्रण ठेवणे आणि शिस्तीचे विनियमन करणे आणि त्यांच्या आरोग्यवर्धनासाठी व्यवस्था करणे ;

(दहा) विद्यार्थीनींचे निवासस्थान, त्यांची शिस्त व अध्ययन यांच्या संबंधात व्यवस्था करणे ;

(अकरा) विद्याविषयक, तंत्रविषयक, प्रशासनिक, लिपिकवर्गीय व इतर पदे निर्माण करणे व त्या पदावर नियुक्त्या करणे ;

(बारा) विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यांमध्ये शिस्तीचे विनियमन करणे व लागू करणे आणि आवश्यक वाटतील अशा शिस्तविषयक उपाययोजना करणे ;

(तेरा) विद्यापीठाला आवश्यक असणाऱ्या प्राध्यापकांच्या, सहयोगी प्राध्यापकांच्या, सहायक प्राध्यापकांच्या, प्रपाठकांच्या आणि व्याख्यात्यांच्या पदांची व इतर कोणत्याही अध्यापनविषयक, विद्याविषयक किंवा संशोधनविषयक पदांची निर्मिती करणे ;

(चौदा) प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहायक प्राध्यापक, प्रपाठक, व्याख्याते किंवा अन्यथा विद्यापीठाचे अन्य अध्यापक किंवा संशोधक म्हणून व्यक्तींची नियुक्ती करणे ;

(पंधरा) अधिछात्रवृत्ती, शिष्यवृत्ती, पारितोषिके व पदके सुरू करणे व ती प्रदान करणे ;

(सोळा) संशोधनविषयक कामांचे मुद्रण, पुनर्निर्मिती व प्रसिद्ध करणे आणि इतर कामे यांकरिता तरतूद करणे आणि प्रदर्शनांचे आयोजन करणे ;

(सतरा) विधि, न्याय व सामाजिक विकास याच्या सर्व पैलूंवरील संशोधन पुरस्कृत करणे व हाती घेणे ;

(अठरा) विद्यापीठ, वेळोवेळी, निर्धारित करील अशा अटी व शर्तींवर मान्य करण्यात येईल त्याप्रमाणे व अशा प्रयोजनासाठी, विधि, न्याय, सामाजिक विकास व संलग्नविषय यातील शिक्षण, प्रशिक्षण व संशोधन या बाबींमध्ये इतर कोणत्याही संघटनेला सहकार्य करणे ;

(एकोणीस) विद्यापीठाच्या उद्दिष्टासारखीच पूर्णत: किंवा अंशत: समान उद्दिष्ट्ये असणाऱ्या जगाच्या इतर भागात असणाऱ्या उच्च शिक्षणाच्या परिसंस्थांबरोबर अध्यापक आणि विद्याव्यासंगी यांची अदलाबदल करून आणि सर्वसामान्यपणे, सामाईक उद्दिष्टांना हितावह होईल अशारीतीने, सहकार्य करणे ;

(वीस) विद्यापीठाच्या लेख्यांची व्यवस्था पाहणे आणि खर्च विनियमित करणे ;

(एकवीस) विद्यापीठास आवश्यक वाटतील, अशाप्रमाणे, विद्यापीठाच्या जागेत किंवा अन्यत्र, वर्गखोल्या आणि अभ्यासकक्ष स्थापन करणे आणि त्या समुचितरितीने सुसज्ज ठेवणे आणि विद्यापीठासाठी सोयीस्कर किंवा आवश्यक असतील अशी ग्रंथालये व वाचनकक्ष तयार करणे व त्यांची व्यवस्था ठेवणे ;

(बावीस) विद्यापीठाच्या प्रयोजनासाठी आणि विद्यापीठ ज्या उद्दिष्टांसाठी स्थापन करण्यात आले आहे त्याच्याशी सुसंगत असतील अशी, अनुदाने, अर्थसहाय्य, वर्गणी, देणग्या व भेटी स्वीकारणे ;

(तेवीस) विद्यापीठास आवश्यक व उचित वाटतील अशा अटी आणि शर्तींवर, विद्यापीठाच्या प्रयोजनासाठी, आवश्यक किंवा सोयीची असेल अशी एखादी जमीन किंवा इमारत किंवा बांधकाम खरेदी करणे, भाडेपट्ट्यावर

घेणे किंवा भेट म्हणून किंवा अन्यथा स्वीकारणे, किंवा अशा कोणत्याही इमारतीचे बांधकाम करणे किंवा त्यात फेरफार करणे आणि ते व्यवस्थित राखणे ;

(चोवीस) विद्यापीठाच्या हितास आणि कामकाजास बाधा न आणता, विद्यापीठास योग्य आणि उचित वाटतील अशा शर्तींवर विद्यापीठाच्या जंगम किंवा स्थावर मालमत्तेचा सर्व किंवा कोणताही भाग विकणे, तिचा विनिमय करणे, ती भाडेपट्ट्याने देणे किंवा तिचा अन्यथा विनियोग करणे ;

परंतु, विद्यापीठ, राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेशिवाय आणि राज्य शासनाने दिलेल्या अटी व शर्तींची पूर्तता केल्याशिवाय, राज्य शासनाने विद्यापीठास दिलेल्या स्थावर व जंगम मालमत्तांची विक्री, अदलाबदल, भाडेकरार किंवा अन्यथा विल्हेवाट लावणार नाही ;

(पंचवीस) वचन-चिठ्ठ्या, विनिमयपत्र, धनादेश किंवा इतर परक्राम्य लेख काढणे व स्वीकारणे, तयार करणे आणि त्यांचे पृष्ठांकन करणे, त्यावर सूट देणे किंवा वाटाघाटी करणे ;

(सव्वीस) शासकीय रोख्यांसह विद्यापीठाच्या मालकीची किंवा विद्यापीठाच्या प्रयोजनासाठी संपादित करावयाची जंगम किंवा स्थावर मालमत्ता, यांच्या बाबतीतील अभिहस्तांतरण, हस्तांतरण, पुन:अभिहस्तांतरण, गहाण, भाडेपट्टा, अनुज्ञप्ती आणि करार निष्पादित करणे ;

(सत्तावीस) विद्यापीठाच्या संबंधातील विलेख निष्पादित करण्यासाठी किंवा कामकाज पार पाडण्यासाठी विद्यापीठास योग्य वाटेल अशा व्यक्तिची नियुक्ती करणे ;

(अठ्ठावीस) विद्यापीठाकडून चालविण्यात येणारे कोणतेही वर्ग किंवा विभाग चालू ठेवण्याचे, थांबविणे आणि बंद करणे ;

(एकोणतीस) अनुदान मिळण्यासाठी केंद्र सरकार, राज्य शासन, विद्यापीठ अनुदान आयोग किंवा इतर प्राधिकरणे यांच्याबरोबर करार करणे ;

(तीस) इष्ट वाटतील अशा अटींवर पैशांचे अनुदान, रोखे किंवा कोणत्याही प्रकारची मालमत्ता स्वीकारणे ;

(एकतीस) विद्यापीठाच्या सर्व किंवा कोणत्याही मालमत्ता व मत्ता यांच्या तारणावर किंवा आधारावर किंवा विद्यापीठास योग्य वाटेल अशा अटी व शर्तींवर किंवा कोणत्याही तारणाशिवाय, बंधपत्रे, गहाणवस्तू किंवा इतर दायित्वे यांवर पैसे उभे करणे आणि कर्जाऊ घेणे ; पैसे उभे करण्यासाठीचा सर्व आनुषंगिक खर्च आणि अशा कर्जाऊ घेतलेल्या कोणत्याही पैशाची परतफेड व विमोचन विद्यापीठाच्या निधितून भागविणे ;

(बत्तीस) विद्यापीठाचा निधी किंवा विद्यापीठाकडे सोपविलेला पैसा, विद्यापीठास योग्य वाटेल अशाप्रमाणे रोख्यात व अशारीतीने गुंतवणे आणि वेळोवेळी, कोणत्याही गुंतवणुकीचे स्वरूप बदलणे ;

(तेहतीस) विद्यापीठाचे कामकाज व व्यवस्थापन याचे नियमन करण्यासाठी वेळोवेळी त्यास आवश्यक वाटेल तसे विनियम करणे आणि त्यात फेरफार, सुधारणा करणे आणि ते विखंडीत करणे ;

(चौतीस) विद्याविषयक, तांत्रिक, प्रशासकीय व इतर कर्मचारीवर्गाच्या हितासाठी विनियमांद्वारे विहित करण्यात येईल अशारीतीने आणि अशा शर्तींना अधीन राहून, विद्यापीठास योग्य वाटेल असे निवृत्तिवेतन, विमा, भविष्यनिर्वाह निधी व उपदाने यांसाठी निधी स्थापन करणे आणि विद्यापीठाच्या प्रत्येक कर्मचाऱ्याच्या लाभासाठी, विद्यापीठाला त्यास योग्य वाटतील अशी अनुदाने देणे आणि विद्यापीठाचा कर्मचारीवर्ग व विद्यार्थी यांच्या हिताकरिता संघटना, परिसंस्था, निधी, न्यास व पूर्वकल्पित अभिहस्तांतरणे यांच्या स्थापनेस व त्यांना पाठबळ देण्यासाठी सहाय्य देणे ;

(पस्तीस) आपले सर्व किंवा त्यापैकी कोणतेही अधिकार, विद्यापीठाचे कुलगुरू किंवा कोणतीही समिती किंवा उप-समिती किंवा त्याच्या मंडळाच्या कोणत्याही एका किंवा अनेक सदस्यांकडे किंवा त्याच्या अधिकाऱ्यांकडे सोपविणे ; आणि

(छत्तीस) उपरोक्त सर्व किंवा त्याच्यापैकी कोणतीही उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी किंवा परिवर्धित करण्यासाठी विद्यापीठास आवश्यक, हितावह किंवा आनुषंगिक वाटतील अशा इतर सर्व कृती आणि गोष्टी करणे.

विद्यापीठातील अध्यापन.

**८.** (१) विद्यापीठाच्या पदव्या, पदविका आणि प्रमाणपत्रे यांच्या संबंधातील सर्व मान्यताप्राप्त अध्यापन हे, विनयमांद्वारे विहित केलेल्या पाठ्यक्रमानुसार, विद्यापीठाच्या अध्यापकांकडून, महापरिषदेच्या नियंत्रणाखाली देण्यात येईल.

(२) पाठ्यक्रम व अभ्यासक्रम आणि असे अध्यापन आयोजित करण्यासाठी जबाबदार असलेले प्राधिकारी विनियमांद्वारे विहित करण्यात येतील.

विद्यापीठाचे कुलपती.

**९.** (१) भारताचे मुख्य न्यायमूर्ती किंवा त्यांची नामनिर्दिष्ट व्यक्ती, जी, सर्वोच्च न्यायालयाची वरिष्ठ न्यायाधीश असेल, ती, विद्यापीठाचे कुलपती असतील.

(२) कुलपतीला, तो निदेश देईल अशी व्यक्ती किंवा अशा व्यक्तींकडून, विद्यापीठ, त्याच्या इमारती, ग्रंथालये व साधनसामग्री आणि विद्यापीठाकडून चालवण्यात येणारी कोणतीही परिसंस्था, आणि त्याचबरोबर, विद्यापीठाकडून आयोजित केलेल्या किंवा घेण्यात येणाऱ्या परीक्षा, अध्यापन आणि इतर कामकाज यांची तपासणी करवून घेण्याचा आणि विद्यापीठाचे प्रशासन आणि वित्तव्यवस्था यांच्याशी संबंधित कोणत्याही बाबीची त्याच पद्धतीने चौकशी करवून घेण्याचा हक्क असेल.

(३) कुलपती, प्रत्येक प्रकरणात, अशा प्रकारे तपासणी करण्याची किंवा चौकशी करण्याच्या त्याच्या उद्देशाबद्दल, विद्यापीठाला नोटीस देईल आणि विद्यापीठाला एक प्रतिनिधी नेमण्याचा हक्क असेल अशा प्रतिनिधीस, अशी तपासणी किंवा चौकशीच्या वेळी उपस्थित राहण्याचा व आपले म्हणणे मांडण्याचा अधिकार असेल.

(४) कुलपती, अशा तपासणीच्या किंवा चौकशीच्या निष्कर्षाच्या संदर्भात कुलगुरुला कळवील आणि कुलगुरु, त्यावर करावयाच्या कार्यवाहीबाबत कुलपतीने देऊ केलेल्या अशा सल्ल्यासह कुलपतीची मते, महापरिषदेस कळवील.

(५) महापरिषद, कुलगुरुच्यामार्फत अशा तपासणी किंवा चौकशीच्या निष्कर्षावर तिने करण्याची योजिलेली किंवा केलेली अशी कारवाई, कोणतीही असल्यास, कुलपतीला कळवील.

विद्यापीठाची प्राधिकरणे.

**१०.** विद्यापीठाची प्राधिकरणे पुढीलप्रमाणे असतील,—

(एक) महापरिषद ;

(दोन) कार्यकारी परिषद ;

(तीन) विद्यापरिषद ;

(चार) वित्त समिती ; आणि

(पाच) विनियमांद्वारे विद्यापीठांची प्राधिकरणे म्हणून संबोधण्यात येतील अशी इतर प्राधिकरणे.

महापरिषद.

**११.** (१) महापरिषद विद्यापीठाचे मुख्य सल्लागार मंडळ असेल आणि त्यामध्ये पुढील सदस्यांचा समावेश असेल,—

(एक) कुलपती ;

(दोन) कुलगुरु ;

(तीन) भारताचे महा न्यायवादी ;

(चार) कुलपतीने नामनिर्देशित केलेला सर्वोच्च न्यायालयाचा एक न्यायाधीश ;

(पाच) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य ;

(सहा) विधि मंत्री, महाराष्ट्र राज्य ;

(सात) मुंबई येथील उच्च न्यायालयाचा मुख्य न्यायमूर्ती किंवा त्याची नामनिर्देशित व्यक्ती ;

(आठ) कुलपतीने नामनिर्देशित करावयाचा मुंबई येथील उच्च न्यायालयाचा एक न्यायाधीश ;

(नऊ) महाराष्ट्राचा महा अधिवक्ता ;

(दहा) विद्यापीठ अनुदान अयोगाचा अध्यक्ष किंवा विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सदस्यांमधील त्याची नामनिर्देशित व्यक्ती ;

(अकरा) अध्यक्ष, भारतीय वकील परिषद किंवा भारतीय वकील परिषदेच्या सदस्यांमधील त्याची नामनिर्देशित व्यक्ती ;

(बारा) अध्यक्ष, महाराष्ट्र वकील परिषद ;

(तेरा) सचिव किंवा प्रधान सचिव किंवा यथास्थिती, अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन ;

(चौदा) कुलपतीने नामनिर्देशित करावयाच्या समाज विज्ञान व मानवविज्ञान विद्याशाखांमधील दोन अग्रगण्य व्यक्ती ;

(पंधरा) कुलपतीने नामनिर्देशित करावयाची विधि क्षेत्रातील एक अग्रगण्य व्यक्ती ;

(सोळा) कुलपतीने नामनिर्देशित करावयाची शिक्षण क्षेत्रातील एक अग्रगण्य व्यक्ती ; आणि

(सतरा) महापरिषदेचे अन्यथा सदस्य नसतील असे कार्यकारी परिषदेचे दोन सदस्य.

**स्पष्टीकरण.—** खंड (पाच) व (सहा) च्या प्रयोजनांकरिता, जर विभागाचा मंत्री हा मुख्यमंत्री असेल तर, त्याने नामनिर्देशित केलेला कोणताही मंत्री हा सदस्य असेल.

(२) कुलपती हा महापरिषदेचा अध्यक्ष असेल.

(३) कुलगुरु हा महापरिषदेचा सचिव असेल.

महापरिषदेच्या सदस्यांचा पदावधी.

**१२.** (१) महापरिषदेच्या पदसिद्ध सदस्यांखेरीज इतर सदस्यांचा पदावधी हा, पोट-कलमे (२), (३) आणि (४) यांच्या तरतुदींना अधीन राहून, तीन वर्षांचा असेल.

(२) महापरिषदेचा एखादा सदस्य त्याने धारण केलेले पद किंवा नियुक्ती या कारणामुळे महापरिषदेचा सदस्य बनल्यास, किंवा नामनिर्देशित सदस्य असल्यास जेव्हा तो अशा पदावर किंवा नियुक्तीवर असण्याचे बंद होईल किंवा, यथास्थिति, त्याचे नामनिर्देशन काढून घेण्यात येईल किंवा रद्द करण्यात येईल, तेव्हाच त्याचे सदस्यत्व समाप्त होईल.

(३) महापरिषदेच्या सदस्याने आपल्या पदाचा राजीनामा दिला असेल, अथवा तो विकल मनाचा झाला असेल, अथवा नादार झाला असेल, अथवा नैतिक अध:पतनाचा समावेश असलेल्या एखाद्या अपराधाबद्दल सिद्धापराध ठरविण्यात आलेला असेल, अथवा जर कुलगुरु व्यतिरिक्त अशा अन्य सदस्याने विद्यापीठामध्ये पूर्णवेळ नियुक्ती स्वीकारलेली असेल, अथवा त्याने कुलपतीची परवानगी मिळवल्याशिवाय महापरिषदेच्या तीन लागोपाठच्या बैठकींना उपस्थित राहण्यात कसूर केली असेल तर, तो महापरिषदेचा सदस्य असल्याचे बंद होईल.

(४) महापरिषदेच्या सदस्यास, कुलपतीला उद्देशून लिहिलेल्या पत्राद्वारे आपल्या पदाचा राजीनामा देता येईल आणि असा राजीनामा कुलपतीने स्वीकारल्यानंतर लगेचच परिणामक होईल.

(५) महापरिषदेमधील कोणतेही रिक्त पद, ते भरण्यास हक्कदार असलेल्या संबंधित प्राधिकाऱ्याकडून एखाद्या व्यक्तीची एकतर नियुक्ती करून, किंवा यथास्थिति, नामनिर्देशनाद्वारे भरण्यात येईल आणि अशाप्रकारे नियुक्त किंवा नामनिर्देशित केलेली व्यक्ती, ज्याच्या पदावर तिची नियुक्ती किंवा नामनिर्देशन करण्यात आले असेल त्या सदस्याचे जर ते पद रिक्त झाले नसते तर त्याने ते पद जितक्या मुदतीकरिता धारण केले असते तितक्याच मुदतीकरिता ते पद धारण करील.

महापरिषदेचे अधिकार व कार्ये.

**१३.** महापरिषदेचे अधिकार व कार्ये पुढीलप्रमाणे असतील :—

(एक) विद्यापीठाची व्यापक धोरणे व कार्यक्रम यांचा वेळोवेळी आढावा घेणे आणि विद्यापीठाची सुधारणा व विकास यांकरिता उपाय सुचविणे ;

(दोन) वार्षिक अहवाल, वित्तीय अंदाज व अशा लेख्यांवरील लेखापरीक्षा अहवाल यांवरील ठरावांवर विचार करणे व ते संमत करणे ;

(तीन) विद्यापीठाचे कार्यक्षम कार्यचालन व प्रशासन यांच्या दृष्टीने तिला आवश्यक वाटतील अशी अन्य कोणतीही कार्ये पार पाडणे.

महापरिषदेच्या बैठका.

**१४.** (१) महापरिषदेची बैठक वर्षातून किमान एकदा घेण्यात येईल. कोणत्याही वर्षाच्या बाबतीत महापरिषदेने दुसरा कोणताही दिनांक निश्चित केलेला नसेल तर, महापरिषदेची वार्षिक बैठक ही, कार्यकारी परिषदेने निश्चित केलेल्या दिनांकास घेण्यात येईल.

(२) कुलपती उपस्थित असेल तेव्हा, तो बैठकीच्या अध्यक्षस्थानी असेल. कुलपतीच्या अनुपस्थितीत त्याने नामनिर्देशित केलेला महापरिषदेचा कोणताही सदस्य त्या बैठकीचे अध्यक्षस्थान भूषवील.

(३) महापरिषदेच्या वार्षिक बैठकीमध्ये, कुलगुरु, जमा व खर्च यांचे विवरणपत्र, लेखापरिक्षित केलेला ताळेबंद व वित्तीय अंदाज यांच्यासह, आगोदरच्या वर्षातील विद्यापीठाच्या कामकाजाचा अहवाल महापरिषदेला सादर करील.

(४) कुलपती किंवा त्याच्या अनुपस्थितीत, कुलगुरु एकतर स्वत: होऊन किंवा महापरिषदेच्या दहापेक्षा कमी नसतील इतक्या सदस्यांच्या विनंतीवरून महापरिषदेची बैठक बोलावील.

(५) महापरिषदेच्या प्रत्येक बैठकीची नोटीस पंधरा दिवसांपूर्वी देण्यात येईल.

(६) महापरिषदेच्या विद्यमान सदस्यांच्या एक-तृतीयांश सदस्यांनी मिळून गणपूर्ती होईल.

(७) प्रत्येक सदस्याला एक मत असेल आणि महापरिषदेने निर्णय द्यावयाच्या कोणत्याही प्रश्नावर समसमान मते पडली तर, बैठकीच्या अध्यक्षपदी असलेल्या व्यक्तीला त्याच्या मताखेरीज निर्णायक मत देण्याचा अधिकार असेल.

(८) सदस्यांमध्ये मतभिन्नता असेल तर सदस्यांचे बहुमत अभिभावी होईल.

(९) महापरिषदेने कोणतीही तात्काळ कार्यवाही करण्याची आवश्यकता असेल तर, कुलगुरुला महापरिषदेच्या सदस्यांना कागदपत्रांचे वाटप करून, कामकाज चालविण्यास परवानगी देता येईल. हाती घ्यावयाची प्रस्तावित कार्यवाही ही, महापरिषदेच्या बहुतांश सदस्यांनी संमती दिल्याखेरीज हाती घेण्यात येणार नाही. अशा प्रकारे केलेली कार्यवाही, महापरिषदेच्या सर्व सदस्यांना तात्काळ कळविण्यात येईल. पुष्टी देण्यासाठी ही कागदपत्रे, महापरिषदेच्या पुढील बैठकीत मांडण्यात येतील.

कार्यकारी परिषद.

**१५.** (१) कार्यकारी परिषद हे विद्यापीठाचे मुख्य कार्यकारी मंडळ असेल.

(२) विद्यापीठाचे प्रशासन, व्यवस्थापन व नियंत्रण आणि त्याचे उत्पन्न हे कार्यकारी परिषदेकडे निहित असेल व ती विद्यापीठाच्या मालमत्तेचे व निधीचे नियंत्रण व प्रशासन करील.

(३) कार्यकारी परिषदेमध्ये पुढील व्यक्तींचा समावेश असेल :—

(एक) कुलगुरु ;

(दोन) कुलपतीने नामनिर्देशित करावयाचा महापरिषदेचा सदस्य, जो न्यायाधीश असेल ;

(तीन) सचिव, प्रधान सचिव किंवा यथास्थिति, अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन ;

(चार) सचिव, प्रधान सचिव किंवा यथास्थिति, अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, महाराष्ट्र शासन ;

(पाच) सचिव किंवा प्रधान सचिव, विधि व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन ;

(सहा) महापरिषदेचा सदस्य, जी विधि क्षेत्रातील अग्रगण्य व्यक्ती असेल ;

(सात) महापरिषदेचा सदस्य, जो शिक्षण क्षेत्रातील अग्रगण्य व्यक्ती असेल ;

(आठ) कुलगुरुने नामनिर्देशित करावयाचे विद्यापीठाचे पाच प्राध्यापक किंवा सहयोगी प्राध्यापक.

(४) कुलगुरु हा कार्यकारी परिषदेचा अध्यक्ष असेल.

कार्यकारी परिषदेचा पदावधी.

**१६.** (१) एखाद्या व्यक्तीने धारण केलेल्या पदाच्या किंवा नियुक्तीच्या कारणाने ती कार्यकारी परिषदेचा सदस्य झाली असेल त्याबाबतीत ती जेव्हा ते पद किंवा नियुक्ती धारण करण्याचे बंद होईल तेव्हा तिचे सदस्यत्व संपुष्टात येईल.

(२) कार्यकारी परिषदेच्या सदस्याने आपल्या पदाचा राजीनामा दिला असेल अथवा तो विकल मनाचा झाला असेल, अथवा नादार झाला असेल, अथवा नैतिक अध:पतनाचा समावेश असलेल्या एखाद्या अपराधाबद्दल सिद्धापराध ठरवलेला असेल अथवा जर कुलगुरु किंवा विद्याशाखेतील सदस्य यांव्यतिरिक्त अन्य सदस्याने विद्यापीठामध्ये पूर्णवेळ नियुक्ती स्वीकारली असेल अथवा त्याने कार्यकारी परिषदेच्या अध्यक्षाच्या परवानगीशिवाय कार्यकारी परिषदेच्या लागोपाठच्या तीन बैठकींना उपस्थित राहण्यात कसूर केली असेल तर, तो कार्यकारी परिषदेचा सदस्य असण्याचे बदं होईल.

(३) कार्यकारी परिषदेच्या सदस्यांचे सदस्यत्व पोट-कलम (१) अन्वये समाप्त झाले नसेल किंवा ते पोट-कलम (२) अन्वये बंद झाले नसेल तर, कार्यकारी परिषदेचे सदस्य, ज्या दिनांकास ते कार्यकारी परिषदेचे सदस्य होतील त्या दिनांकापासून तीन वर्षे संपल्यानंतर सदस्य असण्याचे बंद होईल, परंतु ते पुनर्नामनिर्देशन करण्यास किंवा, यथास्थिति पुनर्नियुक्ती करण्यास पात्र असतील :

परंतु, पहिल्या कार्यकारी परिषदेचा पदावधी पाच वर्षे इतका असेल.

(४) पदसिद्ध सदस्याव्यतिरिक्त, कार्यकारी परिषदेच्या सदस्यास कार्यकारी परिषदेच्या अध्यक्षाला उद्देशून पत्राद्वारे आपल्या पदाचा राजीनामा देता येईल आणि कार्यकारी परिषदेच्या अध्यक्षाने तो राजीनामा स्वीकारल्यानंतर लगेचच तो परिणामक होईल.

(५) कार्यकारी परिषदेतील कोणतेही रिक्त पद, ते भरण्यास हक्कदार असलेल्या संबंधित प्राधिकाऱ्याकडून एकतर नियुक्तीद्वारे, किंवा, यथास्थिति नामनिर्देशनाद्वारे, भरण्यात येईल आणि अशा प्रकारे नियुक्त किंवा नामनिर्देशित केलेली व्यक्ती ज्याच्या जागी तिला नियुक्त किंवा नामनिर्देशित करण्यात आले असेल त्याने जर ते पद रिक्त झाले नसते तर ते पद जितक्या मुदतीकरिता धारण केले असते तितक्या मुदतीकरिता ते पद धारण करील.

**१७.** (१) कलम १५ च्या तरतुदींना बाधा येऊ न देता कार्यकारी परिषदेचे अधिकारी व कार्ये पुढीलप्रमाणे असतील :— कार्यकारी परिषदेचे अधिकार व कार्ये.

(एक) नियुक्तीच्या प्रयोजनार्थ विनियमांद्वारे घटित केलेल्या निवड समितीच्या शिफारशीवरून, त्यास आवश्यक वाटेल त्याप्रमाणे कुलगुरु, कुलसचिव, ग्रंथपाल, प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहायक प्राध्यापक व अध्यापक वर्गीय इतर सदस्य यांची वेळोवेळी नियुक्ती करणे :

परंतु, दुसऱ्या परंतुकामध्ये अंतर्भूत असलेल्या प्रकरणांखेरीज, विद्यापरिषदेच्या शिफारशी विचारात घेतल्याखेरीज, शिक्षकांची संख्या, अर्हता व वित्तलब्धी यांच्याबाबतीत, कार्यकारी परिषदेकडून कोणतीही कारवाई करण्यात येणार नाही :

परंतु, आणखी असे की,—

(क) कोणत्याही अधिसंख्य पदावरील नियुक्तीसाठी ; किंवा

(ख) कार्यकारी परिषदेने आमंत्रित केलेल्या उच्च विद्याप्राविण्य, श्रेष्ठत्व व व्यावसायिक नैपुण्य असलेल्या व्यक्तीची प्राध्यापक पदावरील नियुक्ती करण्यासाठी ;

कोणतीही निवड समिती घटित करण्याची आवश्यकता असणार नाही ;

(दोन) प्रशासकीय, लिपिकवर्गीय व इतर आवश्यक पदे निर्माण करणे, अशा पदांची संख्या व वित्तलब्धी निश्चित करणे, अशा पदांवरील नियुक्तीकरिता किमान अर्हता विनिर्दिष्ट करणे व यासंदर्भात केलेल्या विनियमांद्वारे विहित करण्यात येतील अशा अटी व सेवा शर्तींवर व्यक्तींची, अशा पदांवर नियुक्ती करणे, किंवा कार्यकारी परिषद वेळोवेळी एकतर सर्वसाधारणपणे अथवा विनिर्देशपूर्वक निदेश देईल अशा प्राधिकाऱ्याकडे वा प्राधिकाऱ्यांकडे किंवा अधिकाऱ्याकडे वा अधिकाऱ्यांकडे नियुक्तीबाबतचे अधिकार निर्णयाद्वारे सोपवणे ;

(तीन) विनियमांना अनुसरून विद्यापीठाच्या कोणत्याही अधिकाऱ्यास नैमित्तिक रजा वगळता अनुपस्थितीची परवानगी देणे आणि त्याच्या अनुपस्थितीत अशा अधिकाऱ्याची कार्ये पार पाडण्याकरिता आवश्यक ती व्यवस्था करणे ;

(चार) विद्यापीठाची वित्तव्यवस्था, लेखे, गुंतवणुका, मालमत्ता, कामकाज व अन्य सर्व प्रशासनिक कारभार याबाबत व्यवस्था करणे व ते विनियमित करणे आणि त्या प्रयोजनार्थ तिला योग्य वाटतील असे अभिकर्ते नियुक्त करणे ;

(पाच) कोणत्याही अनुपयोजित उत्पन्नासह विद्यापीठाचे कोणतेही धन तिला वेळोवेळी योग्य वाटेल त्याप्रमाणे रोखे, निधी, भाग अथवा कर्जरोखे यांमध्ये किंवा भारतातील स्थावर मालमत्तेच्या खरेदीमध्ये, अशा गुंतवणुकीत वेळोवेळी बदल करण्याच्या तत्सम अधिकाराने गुंतविणे ;

(सहा) विद्यापीठाच्या वतीने कोणत्याही जंगम वा स्थावर मालमत्तेचे हस्तांतरण करणे किंवा हस्तांतरण स्वीकारणे ;

(सात) विद्यापीठाच्या वतीने संविदा करणे, त्यात बदल करणे, तिचे पालन करणे व ती रद्द करणे आणि त्या प्रयोजनांसाठी तिला योग्य वाटेल अशा अधिकाऱ्यांची नियुक्ती करणे ;

(आठ) विद्यापीठाचे कामकाज पार पाडण्यासाठी आवश्यक असलेल्या इमारती, जागा, फर्निचर आणि उपकरणे व इतर साधने यांची तरतूद करणे ;

(नऊ) जे, न्यायालयाच्या आदेशाव्यतिरिक्त कोणत्याही कारणामुळे व्यथित झाले असतील असे विद्यापीठाचे अधिकारी, विद्यापीठातील अध्यापक, विद्यार्थी व कर्मचारी यांची कोणतीही गाऱ्हाणी विचारार्थ स्वीकारणे, त्यावर अभिनिर्णय करणे आणि तिला योग्य वाटत असेल तर, ती दूर करणे ;

(दहा) विद्यापरिषदेशी विचारविनिमय करून, परीक्षक व नियामक यांच्या नियुक्त्या करणे आणि आवश्यकता भासल्यास, त्यास काढून टाकणे आणि त्यांची फी, वितलब्धी आणि प्रवास व इतर भत्ते निश्चित करणे ;

(अकरा) विद्यापीठाच्या सामाईक मुद्रेची निवड करणे आणि मुद्रा अभिरक्षेत ठेवण्यासाठी तरतूद करणे ; आणि

(बारा) या अधिनियमाद्वारे किंवा त्याअन्वये तिला प्रदान करण्यात येतील अशा इतर अधिकारांचा वापर करणे आणि तिच्यावर सोपविण्यात येतील अशी इतर कार्ये पार पाडणे.

कार्यकारी परिषदेच्या बैठका.

**१८.** (१) कार्यकारी परिषद, किमान तीन महिन्यांतून एकदा बैठक घेईल आणि अशा बैठकीची नोटीस ही, पंधरा दिवसांपेक्षा कमी नसेल इतक्या दिवसांपूर्वी देण्यात येईल.

(२) कार्यकारी परिषदेच्या सहा सदस्यांनी मिळून तिच्या कोणत्याही बैठकीची गणपूर्ती होईल.

(३) सदस्यांमध्ये मतभिन्नता असल्यास, बहुमत अभिभावी होईल.

(४) कार्यकारी परिषदेच्या प्रत्येक सदस्याला एक मत असेल आणि कार्यकारी परिषदेकडून निर्णय घ्यावयाच्या कोणत्याही प्रश्नावर समसमान मते पडली असतील तर, कार्यकारी परिषदेच्या अध्यक्षाला किंवा, यथास्थिति, त्या बैठकीच्या अध्यक्षस्थानी असलेल्या सदस्याला आणखी एक निर्णायक मत असेल.

(५) कार्यकारी परिषदेचा अध्यक्ष या नात्याने कुलगुरु हा, कार्यकारी परिषदेच्या प्रत्येक बैठकीच्या अध्यक्षस्थानी असेल आणि त्याच्या अनुपस्थितीत, उपस्थित असलेल्या सदस्यांनी निवडलेला सदस्य त्याप्रसंगी अध्यक्षस्थानी असेल.

(६) कार्यकारी परिषदेने कोणतीही तात्काळ कार्यवाही करण्याची आवश्यकता असेल तर, कुलगुरुला, कार्यकारी परिषदेच्या सदस्यांना कागदपत्रांचे वाटप करून, कामकाज चालविण्यास परवानगी देता येईल. प्रस्तावित कार्यवाही ही, कार्यकारी परिषदेच्या बहुतांश सदस्यांनी संमती दिल्याखेरीज हाती घेण्यात येणार नाही. अशाप्रकारे केलेली कार्यवाही, कार्यकारी परिषदेच्या सर्व सदस्यांना तात्काळ कळविण्यात येईल. पुष्टी देण्यासाठी ही कागदपत्रे, कार्यकारी परिषदेच्या पुढील बैठकीत मांडण्यात येतील.

स्थायी समिती घटित करणे व कार्यकारी परिषदेने तदर्थ समित्या नेमणे.

**१९.** (१) या अधिनियमाच्या तरतुदींना व याबाबतीत केलेल्या विनियमांना अधीन राहून, कार्यकारी परिषदेला, ठरावाद्वारे, विद्यापीठाच्या कोणत्याही अधिकाराचा वापर करण्यासाठी किंवा विद्यापीठाच्या कोणत्याही बाबींची चौकशी करण्यासाठी, त्या बाबीवर अहवाल देण्यासाठी किंवा सल्ला देण्यासाठी कार्यकारी परिषदेला योग्य वाटेल अशा प्रयोजनाकरिता व अशा अधिकारांसह, स्थायी समित्या घटित करता येतील किंवा तदर्थ समित्या नेमता येतील.

(२) कार्यकारी परिषदेला, स्थायी समितीवर किंवा तदर्थ समितीवर योग्य वाटेल अशा व्यक्तींना स्वीकृत करता येईल आणि कार्यकारी परिषदेच्या बैठकींना उपस्थित राहण्याची त्यांना परवानगी देता येईल.

**२०.** कार्यकारी परिषदेला, कुलगुरु किंवा समितीने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल कार्यकारी परिषदेच्या पुढील बैठकीत देण्यात येईल या शर्तीस अधीन राहून, परिषदेला योग्य वाटतील असे अधिकार कुलगुरुकडे किंवा अशा समितीकडे ठरावाद्वारे सोपविता येतील. कार्यकारी परिषदेने अधिकार सोपविणे.

**२१.** विद्यापरिषद ही, विद्यापीठाचा शैक्षणिक निकाय असेल आणि या अधिनियमाच्या तरतुदींना व विनियमांना अधीन राहून, तिला विद्यापीठातील अध्यापन, शिक्षण व परीक्षा यांच्या नियंत्रणाचा व त्यांचे सर्वसाधारण विनियमन करण्याचा अधिकार असेल, त्यांचा दर्जा राखण्यासाठी जबाबदार असेल, आणि या अधिनियमाद्वारे किंवा विनियमाद्वारे, तिला प्रदान करण्यात येतील अशा इतर अधिकारांचा ती वापर करील आणि तिच्यावर सोपविण्यात येतील अशी इतर कार्ये ती पार पाडील. सर्व शैक्षणिक बाबींवर, कार्यकारी परिषदेला सल्ला देण्याचा अधिकार तिला असेल. विद्यापरिषद.

**२२.** विद्यापरिषदेमध्ये पुढील व्यक्तींचा समावेश असेल :— विद्यापरिषदेची रचना.

(क) कुलगुरु—अध्यक्ष ;

(ख) जे विद्यापीठाच्या सेवेत नसतील असे नामवंत शिक्षणतज्ज्ञ किंवा साहित्यिक किंवा सन्मान प्राप्त किंवा व्यवसायातील सदस्य किंवा प्रख्यात व्यक्ती, यांमधून कुलपतींनी नामनिर्देशित केलेल्या तीन व्यक्ती ;

(ग) राज्य शासनाने नामनिर्देशित केलेली एक व्यक्ती ;

(घ) भारतीय वकील परिषदेची एक नामनिर्देशित व्यक्ती ;

(ङ) सर्व विभाग प्रमुख ;

(च) विभाग प्रमुखांव्यतिरिक्त इतर सर्व प्राध्यापक ;

(छ) विद्यापीठातील सहयोगी व सहायक प्राध्यापकांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या अध्यापन कर्मचारी वर्गातील दोन सदस्य.

(२) पदसिद्ध सदस्य आणि ज्यांची मुदत पोट-कलम (१) च्या खंड (ग) मध्ये विनिर्दिष्ट केली आहे त्यांच्याव्यतिरिक्त, इतर सदस्यांची मुदत तीन वर्षे असेल :

परंतु, पहिल्या विद्यापरिषदेची मुदत पाच वर्षे इतकी असेल.

**२३.** या अधिनियमाच्या तरतुदींना व विनियमांना अधीन राहून, विद्यापरिषदेला, तिच्याकडे निहित केलेल्या इतर सर्व अधिकारांशिवाय, पुढील अधिकार व कार्ये असतील :— विद्यापरिषदेचे अधिकार व कार्ये.

(एक) महापरिषदेने किंवा कार्यकारी परिषदेने तिच्याकडे निर्देश केलेल्या किंवा सोपविलेल्या कोणत्याही बाबींवर अहवाल देणे ;

(दोन) विद्यापीठात अध्यापकांची पदे निर्माण करणे, ती रद्द करणे किंवा त्यांचे वर्गीकरण करणे आणि त्यांच्या वित्तलब्धी व त्यांच्याशी संलग्न असलेली कर्तव्ये यासंबंधात कार्यकारी परिषदेला शिफारशी करणे ;

(तीन) विद्याशाखांची रचना करण्यासाठी योजना तयार करणे, त्यात फेरबदल करणे किंवा सुधारणा करणे आणि अशा विद्याशाखांना त्यांचे संबंधित विषय नेमून देणे, आणि तसेच कोणतीही विद्याशाखा बंद करण्याचा किंवा तिचा उप विभाग करण्याच्या किंवा एका विद्याशाखेचे दुसऱ्या विद्याशाखेत एकत्रिकरण करण्याच्या, इष्टतेविषयी कार्यकारी परिषदेला अहवाल देणे ;

(चार) विद्यापीठात नावनोंदणी केलेल्या व्यक्तींव्यतिरिक्त इतर व्यक्तींचे शिक्षण व परीक्षा यांकरिता विनियमांद्वारे व्यवस्था करणे ;

(पाच) विद्यापीठामध्ये संशोधनाला चालना देणे आणि अशा संशोधनावरील अहवाल वेळोवेळी मागवणे ;

(सहा) विद्याशाखांनी सादर केलेल्या प्रस्तावावर विचार करणे ;

(सात) विद्यापीठात प्रवेशासाठी समित्या नेमणे ;

(आठ) इतर विद्यापीठे व संस्था यांच्या पदविका व पदव्यांना मान्यता देणे आणि विद्यापीठाच्या पदविका व पदव्या यांच्याशी त्यांची समकक्षता निर्धारित करणे ;

(नऊ) महापरिषदेने स्वीकारलेल्या कोणत्याही शर्तींना अधीन राहून, अधिछात्रवृत्ती, शिष्यवृत्ती व इतर पारितोषिके यांच्याकरिता स्पर्धांची वेळ, पद्धत व शर्ती निश्चित करणे आणि ती प्रदान करणे ;

(दहा) परीक्षकांच्या नियुक्त्या करणे व आवश्यकता भासल्यास त्यांना काढून टाकणे आणि त्यांची फी वित्तलब्धी आणि प्रवास व इतर भत्ते ठरविणे यासंबंधात कार्यकारी परिषदेला शिफारशी करणे ;

(अकरा) परीक्षा घेण्यासाठी व्यवस्था करणे आणि त्या घेण्याकरिता तारखा निश्चित करणे ;

(बारा) विविध परीक्षांचा निकाल जाहीर करणे किंवा त्यासाठी समित्या किंवा अधिकारी यांच्या नियुक्त्या करणे आणि पदव्या, विशेष प्राविण्य पदव्या, पदविका, सनद, उपाधी व विशेष प्राविण्य पदव्या प्रदान करण्यासंबंधात किंवा देण्यासंबंधात शिफारशी करणे ;

(तेरा) विद्यावेतन, शिष्यवृत्ती, पदके व पारितोषिके प्रदान करणे आणि इतर पुरस्कारांशी संबंधित असतील अशा विनियमांनुसार व अशा इतर शर्तींनुसार पुरस्कार देणे ;

(चौदा) विहित केलेल्या किंवा शिफारस केलेल्या पाठ्यपुस्तकांच्या याद्या प्रसिद्ध करणे आणि विहित केलेल्या अभ्यास पाठ्यक्रमांचा अभ्यासक्रम प्रसिद्ध करणे ;

(पंधरा) विनियमांद्वारे वेळोवेळी विहित करण्यात येतील असे नमुने व नोंदवह्या तयार करणे ; आणि

(सोळा) विद्याविषयक बाबींच्या संबंधात, या अधिनियमाच्या व विनियमांच्या तरतुदीचे योग्यरीतीने पालन करण्यासाठी आवश्यक असतील अशी सर्व कर्तव्य पार पाडणे आणि अशा सर्व कृती करणे.

विद्यापरिदेच्या बैठकांची कार्यपद्धती.

**२४.** (१) विद्यापरिषदेची आवश्यकता असेल त्याप्रमाणे, परंतु एका विद्यावर्षात दोनपेक्षा कमी नसेल इतक्या वेळा बैठक होईल.

(२) विद्यापरिषद सदस्यांच्या एकूण संख्येपैकी एक-द्वितीयांश सदस्यसंख्येने, विद्यापरिषदेच्या बैठकीची गणपूर्ती होईल.

(३) सदस्यांमध्ये मतभिन्नता असल्यास, बहुमत अभिभावी होईल.

(४) विद्यापरिषदेच्या अध्यक्षासह विद्यापरिषदेच्या प्रत्येक सदस्याला एक मत असेल आणि विद्यापरिषदेने निर्णय घ्यावयाच्या कोणत्याही प्रश्नावर समसमान मते पडली तर, विद्यापरिषदेच्या अध्यक्षाला किंवा यथास्थिति, बैठकीच्या अध्यक्षस्थानी असलेल्या सदस्याला त्याच्या मताखेरीज निर्णायक मत देण्याचा अधिकार असेल.

(५) विद्यापरिषदेचा अध्यक्ष हा, विद्यापरिषदेच्या प्रत्येक बैठकीच्या अध्यक्षस्थानी असेल आणि त्याच्या अनुपस्थितीत त्यावेळी बैठकीत निवडलेला सदस्य अध्यक्षस्थानी असेल.

(६) विद्यापरिषदेने कोणतीही तात्काळ कार्यवाही करण्याची आवश्यकता असेल तर, विद्यापरिषदेच्या अध्यक्षाला, विद्यापरिषदेच्या सदस्यांना कागदपत्रांचे वाटप करून, कामकाज चालविण्यास परवानगी देता येईल. प्रस्तावित कार्यवाही ही, विद्यापरिषदेच्या बहुतांश सदस्यांनी संमती दिल्याखेरीज हाती घेण्यात येणार नाही. अशाप्रकारे करण्यात आलेली कार्यवाही, विद्यापरिषदेच्या सर्व सदस्यांना तात्काळ कळविण्यात येईल. पुष्टी देण्यासाठी ही कागदपत्रे, विद्यापरिषदेच्या पुढील बैठकीत मांडण्यात येतील.

**२५.** (१) कार्यकारी परिषदेकडून घटित करण्यात येईल अशी एक वित्त समिती असेल, ज्यात पुढील सदस्यांचा समावेश असेल :— वित्त समिती.

(एक) कुलगुरु ;

(दोन) कार्यकारी परिषद, आपल्या सदस्यांमधून नामनिर्देशित करील असे तीन सदस्य, ज्यापैकी किमान एक सदस्य राज्य शासनाचा प्रतिनिधी असेल ;

(तीन) विद्यापीठाचा वित्त व लेखा अधिकारी.

(२) कुलगुरुखेरीज, वित्त समितीचे इतर सदस्य, तीन वर्षांच्या कालावधीकरिता पद धारण करतील.

(३) वित्त समितीचे अधिकार व कार्ये पुढीलप्रमाणे असतील :—

(एक) विद्यापीठाच्या वार्षिक अर्थसंकल्पाची तपासणी व छाननी करणे आणि कार्यकारी परिषदेला वित्तीय बाबींवर शिफारशी करणे ;

(दोन) नवीन खर्चाच्या सर्व प्रश्नांवर विचार करणे आणि कार्यकारी परिषदेला शिफारशी करणे ;

(तीन) लेख्यांच्या नियतकालिक विवरणांवर विचार करणे आणि वेळोवेळी, विद्यापीठाच्या वित्तव्यवस्थेचे पुनर्विलोकन करणे ; आणि पुनर्विनियोजन विवरणे व लेखापरीक्षा अहवाल यावर विचार करणे आणि कार्यकारी परिषदेला शिफारशी करणे ;

(चार) विद्यापीठाला बाधा पोचविणाऱ्या कोणत्याही वित्तीय प्रश्नावर, एकतर स्वत:हून किंवा कार्यकारी परिषद किंवा कुलगुरु यांनी निर्देश केल्यावर, आपली मते देणे आणि शिफारशी करणे.

(४) वित्त समितीची वर्षातून किमान दोन वेळा बैठक घेण्यात येईल. वित्त समितीच्या तीन सदस्यांनी गणपूर्ती होईल.

(५) कुलगुरु वित्त समितीच्या बैठकीचा अध्यक्ष असेल आणि त्याच्या अनुपस्थितीत, बैठकीत निवडलेला सदस्य, बैठकीचा अध्यक्ष असेल. सदस्यांमध्ये मतभिन्नता असेल त्याबाबतीत, उपस्थित असलेल्या सदस्यांचे बहुमत अभिभावी होईल.

**२६.** (१) कार्यकारी परिषद, विद्यापीठातील प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहायक प्राध्यापक आणि इतर शिक्षक यांच्या पदांसाठी नियुक्ती करण्याकरिता कार्यकारी परिषदेला शिफारशी करण्यासाठी, निवड समिती घटित करील. निवड समित्या.

(२) निवड समितीमध्ये पुढील सदस्यांचा समावेश असेल :—

(एक) कुलगुरु, जो समितीचा अध्यक्ष असेल ;

(दोन) संबंधित विभागाचे प्रमुख, कोणताही असल्यास, परंतु, ज्या पदाकरिता निवड करावयाची आहे, त्या पदाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचे पद त्याने धारण केलेले असू नये ;

(तीन) प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहायक प्राध्यापक यांच्या निवडीकरिता, विद्यापरिषदेने शिफारस केलेल्या आणि कार्यकारी परिषदेने मान्य केलेल्या नावांच्या नामिकेमधून कुलगुरुने नामनिर्देशित केलेले तीन तज्ज्ञ ;

(३) कुलगुरु आवश्यक असेल तेव्हा निवड समितीची बैठक बोलावील. कुलगुरु निवडसमितीच्या बैठकीचा अध्यक्ष असेल. निवड समितीचे तीन सदस्य उपस्थित असल्यास, ज्यापैकी एक तज्ज्ञ सदस्य असेल तर, बैठकीची गणपूर्ती होईल.

विद्यापीठाचे अधिकारी.

**२७.** (१) विद्यापीठाचे अधिकारी पुढीलप्रमाणे असतील :—

(एक) कुलगुरु ;

(दोन) कुलसचिव ;

(तीन) विभागांचे प्रमुख ;

(चार) वित्त व लेखा अधिकारी ; आणि

(पाच) विनियमांद्वारे विहित करण्यात येतील असे इतर अधिकारी.

कुलगुरु.

**२८.** (१) कुलगुरुची नियुक्ती ही याबाबतीत केलेल्या विनियमांनुसार आणि कुलपतीशी विचार-विनिमय करून, कार्यकारी परिषदेकडून करण्यात येईल :

परंतु, पहिल्या कुलगुरुची नियुक्ती, कुलपतीच्या मान्यतेने राज्य शासनाकडून करण्यात येईल.

(२) कार्यकारी परिषदेच्या विशेष सेवा सर्वसाधारण निदेशांच्या अधीन राहून, कुलगुरु, विद्यापीठाचे व्यवस्थापन व प्रशासन यातील कार्यकारी परिषदेच्या सर्व अधिकारांचा वापर करील.

(३) कुलगुरु एक विद्येकनिष्ठ व्यक्ति आणि विद्यापीठातील कायद्याचा प्राध्यापक असेल, तो पाच वर्षांच्या कालावधीसाठी पद धारण करील, ते नवीकरण योग्य असेल. जे कार्यकारी परिषदेकडून तशा आशयाच्या ठरावाद्वारे किंवा शिक्षक कर्मचारीवर्गाच्या सदस्यांच्या निवृत्तीच्या वयापर्यंत, यांपैकी जे आधीचे असेल, इतक्या मुदतीपर्यंत असेल. ही मुदत समाप्त झाल्यावर, तो, त्याचा उत्तराधिकारी नियुक्त होईपर्यंत आणि त्याचे अधिकार पद ग्रहण करीपर्यंत, त्या पदावर कायम राहील.

(४) कुलगुरु,—

(एक) या अधिनियमाच्या व विनियमाच्या तरतुदींचे यथोचितरित्या पालन केले जात आहे याची सुनिश्चिती करील आणि त्या प्रयोजनार्थ, आवश्यक असतील असे सर्व अधिकार त्याला असतील ;

(दोन) महापरिषद, कार्यकारी परिषद, विद्यापरिषद यांच्या बैठका बोलावील आणि या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्यासाठी आवश्यक असतील अशा इतर सर्व कृती करील ;

(तीन) विद्यापीठातर्फे किंवा विद्यापीठाविरुद्ध केलेल्या दाव्यात किंवा कार्यवाहीत विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करील, मुखत्यारनाम्यावर स्वाक्षरी करील आणि कार्यवाह्यांचे सत्यापन करील किंवा त्या प्रयोजनार्थ प्रतिनिधी प्रतिनियुक्त करील ;

(चार) विद्यापीठामध्ये योग्य शिस्त राखण्यासंबंधात सर्व अधिकार त्याला असतील.

(५) कुलगुरुच्या मते, तात्काळ कार्यवाही करणे आवश्यक असेल अशी कोणतीही निकडीची परिस्थिती उद्भवल्यास, तो, त्यास आवश्यक वाटेल अशी कार्यवाही करील आणि पुष्टीकरणासाठी त्याचा अहवाल, ज्या प्राधिकारणाद्वारे सामान्यपणे अशी बाब हाताळली जाते, त्या प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत देईल.

**२९.** (१) कुलसचिवांची नियुक्ती कार्यकारी परिषदेकडून करण्यात येईल आणि तो विद्यापीठाचा पूर्णवेळ अधिकारी असेल. कुलसचिवाच्या सेवेच्या अटी व शर्ती या, विनियमांद्वारे विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील. कुलसचिव.

(२) कुलसचिव हा कार्यकारी परिषद, विद्यापरिषद, वित्त समिती व विद्याशाखांचा पदसिद्ध सचिव असेल परंतु त्यास या प्राधिकरणांपैकी कोणत्याही प्राधिकरणाचा सदस्य म्हणून मानण्यात येणार नाही.

(३) कुलसचिव,—

(एक) कार्यकारी परिषद आणि कुलगुरु यांच्या सर्व निदेशांचे आणि आदेशांचे अनुपालन करील ;

(दोन) कार्यकारी परिषद त्याच्याकडे सुपूर्द करील असे विद्यापीठाचे अभिलेख, सामाईक मोहोर आणि विद्यापीठाच्या अशा इतर मालमत्ता यांचा परिरक्षक असेल ;

(तीन) विद्यापीठाची कार्यकारी परिषद, विद्यापरिषद, वित्त समिती, विद्याशाखा आणि प्राधिकाऱ्यांनी नियुक्त केलेली कोणतीही समिती, यांच्या बैठका आयोजित करण्याच्या सर्व नोटिशी बजावील ;

(चार) कार्यकारी परिषद, विद्यापरिषद, वित्त समिती, विद्याशाखा आणि विद्यापीठाच्या प्राधिकाऱ्यांनी नियुक्त केलेली कोणतीही समिती यांच्या सर्व बैठकांची कार्यवृत्ते ठेवील ;

(पाच) कार्यकारी परिषद आणि विद्यापरिषद यांचा अधिकृत पत्रव्यवहार पाहील ;

(सहा) विद्यापीठाच्या प्राधिकरणाच्या बैठकीच्या कार्यसूचीच्या प्रती, त्या निर्गमित करण्यात आल्यानंतर लगेचच आणि प्राधिकरणांच्या बैठकींची कार्यवृत्ते, साधारणपणे, बैठक झाल्यानंतर एका महिन्याच्या आत, कुलपतीला पाठवील ;

(सात) आणिबाणीच्या परिस्थितीमध्ये, जेथे कुलगुरु किंवा यथोचितरीत्या प्राधिकृत केलेला अधिकारी, कृती करण्यास असमर्थ असेल तर, कार्यकारी परिषदेची एक बैठक तात्काळ बोलावील आणि विद्यापीठाचे कामकाज पार पाडण्यासाठी त्यांचे निदेश घेईल ;

(आठ) त्याची कर्तव्ये व कार्ये योग्यरीत्या पार पाडण्यासाठी कुलगुरुला प्रत्यक्ष जबाबदार असेल ; आणि

(नऊ) कार्यकारी परिषद किंवा कुलगुरु वेळोवेळी नेमून देईल अशी इतर कर्तव्ये पार पाडील.

(४) कोणत्याही कारणामुळे कुलसचिवाचे पद रिक्त होईल अशा प्रसंगी, कुलगुरुला योग्य वाटतील असे कुलसचिवाचे अधिकार वापरण्यासाठी, कार्ये व कर्तव्ये पार पाडण्यासाठी विद्यापीठाच्या सेवेतील कोणताही अधिकारी प्राधिकृत करण्याची कुलगुरुला मोकळीक असेल.

**३०.** (१) विद्यापीठातील प्रत्येक विभागाचा एक प्रमुख असेल. विभाग प्रमुख.

(२) विभागप्रमुखाचे अधिकार, कार्ये, नियुक्त्या व सेवेच्या शर्ती या विनियमांद्वारे विहित केल्याप्रमाणे असतील.

**३१.** वित्त व लेखा अधिकाऱ्याची नियुक्ती, विनियमांद्वारे निर्धारित करण्यात येईल अशारीतीने व अशा सेवेच्या अटी व शर्तीवर आणि वित्तलब्धींवर करण्यात येईल आणि तो विनियमांद्वारे निर्धारित करण्यात येईल अशा अधिकरांचा वापर करील व अशी कार्ये पार पाडील. वित्त व लेखा अधिकारी.

**३२.** (१) या प्रयोजनार्थ केलेल्या विनियमांना अधीन राहून, विद्यापीठाचा इतर प्रत्येक अधिकारी किंवा कर्मचारी याची नियुक्ती, विनियमांद्वारे विहित करण्यात येतील अशा सेवेच्या अटी नमूद करून, लेखी कराराद्वारे करण्यात येईल, तो करार विद्यापीठाकडे राहील आणि संबंधित अधिकारी किंवा कर्मचारी यास त्याची एक प्रत देण्यात येईल. इतर अधिकारी व कर्मचारी.

(२) विद्यापीठ आणि त्यांचे कोणतेही अधिकारी, कर्मचारी यांच्यामधील करारातून उद्‌भवणारा कोणताही विवाद हा, संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्या विनंतीवरून किंवा विद्यापीठाच्या सूचनेवरून, विनियमांद्वारे विहित करण्यात येईल त्याप्रमाणे, कार्यकारी परिषदेने नियुक्ती केलेले तीन सदस्यांचे मिळून बनलेल्या लवाद न्यायाधिकरणाकडे विचारार्थ पाठविण्यात येईल.

**३३.** विद्यापीठाचे सर्व स्थायी कर्मचारी हे, कार्यकारी परिषदेकडून याबाबतीत करण्यात येतील अशा विनियमांनुसार, भविष्यनिर्वाह निधी, उपदाने व इतर लाभ मिळण्यास हक्कदार असतील. भविष्यनिर्वाह निधी, उपदाने व इतर लाभ.

**३४.** (१) या अधिनियमाखालील प्रत्येक विद्यापीठासाठी, विद्यापीठ निधी या नावाने ओळखला जाणारा एक विद्यापीठ निधी असेल व त्यामध्ये पुढील बाबींचा समावेश असेल :—

(एक) राज्य शासनांनी दिलेले कोणतेही अशंदान किंवा अनुदान ;

(दोन) विद्यापीठ अनुदान आयोग किंवा केंद्र सरकार यांनी दिलेले कोणतेही अंशदान किंवा अनुदान ;

(तीन) भारतीय वकील परिषदेने दिलेले कोणतेही अंशदान ;

(चार) राज्य वकील परिषदांनी दिलेले कोणतेही अंशदान ;

(पाच) खाजगी व्यक्ती किंवा संस्था यांनी दिलेले कोणतेही इच्छापत्रित दान, देणग्या दाननिधी किंवा इतर अनुदाने ;

(सहा) विद्यापीठाला फी व आकार यांमधून मिळालेले उत्पन्न ; आणि

(सात) इतर कोणत्याही स्त्रोतापासून मिळालेल्या रकमा.

१९३४ चा २. (२) उक्त निधीतील रक्कम ही, कार्यकारी परिषदेकडून ठरविण्यात येईल त्याप्रमाणे भारतीय रिझर्व बँक
१९७० चा ५. अधिनियम, १९३४ यामध्ये व्याख्या केल्यानुसार एखाद्या अनुसूचित बँकेत किंवा बँकिंग कंपनी (उपक्रमाचे संपादन
१९८० चा ४०. व हस्तांतरण) अधिनियम, १९७० किंवा, यथास्थिति बँकिंग कंपनी (उपक्रमाचे संपादन व हस्तांतरण) अधिनियम,
१८८२ चा २. १९८० याअन्वये घटित केलेल्या तत्सम नवीन बँकेत ठेवण्यात येईल किंवा भारतीय न्यास व्यवस्था अधिनियम, १८८२ यामध्ये प्राधिकृत केलेल्या अशा रोख्यांमध्ये गुंतविण्यात येईल.

(३) उक्त निधीचा, विद्यापीठाच्या प्रयोजनासाठी आणि विनियमांद्वारे विहित करण्यात येईल अशारीतीने वापर करण्यात येईल.

वार्षिक लेखे व लेखापरीक्षा. **३५.** (१) कार्यकारी परिषदेच्या निदेशांन्वये विद्यापीठाचे वार्षिक लेखे तयार करण्यात येतील.

(२) कार्यकारी परिषदेने नियुक्त केलेल्या लेखापरीक्षकांकडून विद्यापीठाच्या लेख्यांची, वर्षातून किमान एकदा, लेखापरीक्षा करण्यात येईल :

परंतु , राज्य शासनाला, जेव्हा जेव्हा आवश्यकता वाटेल तेव्हा तेव्हा, विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा लेखापरीक्षकांकडून, विद्यापीठाने व्यवस्थापन केलेल्या संस्थांसह, विद्यापीठाच्या लेख्यांची लेखापरीक्षा करण्यासाठी निदेश देण्याचा अधिकार असेल.

(३) लेखापरीक्षा केलेले लेखे कार्यकारी परिषदेकडून प्रसिद्ध करण्यात येतील आणि लेखापरीक्षा अहवालासोबत लेख्यांची एक प्रत महापरिषदेसमोर ठेवण्यात येईल तसेच ती राज्य शासनाला सादर करण्यात येईल.

(४) महापरिषदेकडून तिच्या वार्षिक बैठकीत वार्षिक लेख्यांवर विचार करण्यात येईल. महापरिषदेला यासंदर्भात ठराव संमत करता येईल व तो कार्यकारी परिषदेला कळवील. कार्यकारी परिषद, महापरिषदेने

केलेल्या सूचनांवर विचार करून आणि तिला योग्य वाटेल त्याप्रमाणे त्या सूचनांवर कार्यवाही करील. कार्यकारी परिषद, तिने केलेली सर्व कार्यवाही किंवा कार्यवाही न करण्याबाबतची कारणे महापरिषदेच्या पुढच्या बैठकीत कळवील.

वित्तीय अंदाज.

**३६.** (१) कार्यकारी परिषद, विनियमांद्वारे विहित करण्यात येईल अशा दिनांकापूर्वी, आगामी वर्षासाठीचे वित्तीय अंदाज तयार करील आणि ते, महापरिषदेसमोर ठेवील.

(२) कार्यकारी परिषदेला, अर्थसंकल्पात तरतूद केलेल्या रकमेपेक्षा करावयाचा खर्च अधिक असेल त्याबाबतीत किंवा निकड असेल त्याबाबतीत, कारणे लेखी नमूद करून, विनियमांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येतील असे निर्बंध व शर्ती यांना अधीन राहून, खर्च करता येईल. अशा अधिक खर्चाच्या संबंधात अर्थसंकल्पात कोणतीही तरतूद करण्यात आलेली नसल्यास, तसा अहवाल, महापरिषदेच्या पुढच्या बैठकीत देण्यात येईल.

वार्षिक अहवाल.

**३७.** (१) कार्यकारी परिषद, ही महापरिषद विनिर्दिष्ट करील अशा तपशिलांचा अंतर्भाव करून प्रत्येक वित्तीय वर्षातील वार्षिक अहवाल तयार करील आणि विनियमांद्वारे विहित करण्यात येईल अशा दिनांकास व दिनांकापूर्वी, तो महापरिषदेला सादर करील. महापरिषदेला त्यावर ठराव संमत करता येईल आणि कार्यकारी परिषद, त्यानुसार कार्यवाही करील. केलेली कार्यवाही महापरिषदेला कळविण्यात येईल.

(२) वार्षिक अहवालाच्या प्रती, महापरिषदेच्या त्यावरील ठरावासह राज्य शासनाला सादर करण्यात येतील. राज्य शासन येणाऱ्या आगामी अधिवेशनात, त्या प्रती, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांसमोर ठेवील.

संविदा निष्पादित करणे.

**३८.** विद्यापीठाचे व्यवस्थापन व प्रशासन यासंबंधातील सर्व संविदा, कार्यकारी परिषदेने केल्याप्रमाणे अभिव्यक्त करण्यात येतील आणि संविदेचे मूल्य दहा लाख रुपयांपेक्षा अधिक असेल तेव्हा, कुलगुरुकडून ती निष्पादित करण्यात येईल आणि दहा लाख रुपयांपेक्षा अधिक नसेल तेव्हा कुलसचिवाकडून ती निष्पादित करण्यात येईल.

विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी पात्रता.

**३९.** (१) कोणत्याही विद्यार्थ्याने, विनियमांद्वारे विहित करण्यात येईल अशा अर्हता धारण केल्याखेरीज तो, पदवी किंवा पदविका यांच्या अभ्यास पाठ्यक्रमासाठी प्रवेश मिळण्यास पात्र असणार नाही.

(२) एकशे वीस पेक्षा जास्त नसतील इतक्या विद्यार्थ्यांना, राष्ट्रीय विधि विद्यापीठांच्या समितीने घेतलेल्या संयुक्त विधि प्रवेश चाचणीतून गुणवत्तेच्या आधारे किंवा विनियमांद्वारे वेळोवेळी विहित करण्यात येईल अशा प्रक्रियेतून, प्रवेश देण्यात येतील.

विद्यार्थ्यांचा निवास.

**४०.** विद्यापीठाचा प्रत्येक विद्यार्थी, विद्यापीठाने चालविलेल्या किंवा मान्यता दिलेल्या वसतिगृहात किंवा विनियमांद्वारे विहित करण्यात येतील अशा शर्तींनुसार निवास करील.

सन्मान्य पदवी.

**४१.** विद्यापरिषदेच्या किमान दोन-तृतीयांश सदस्यांनी, कोणतीही व्यक्ती ही, त्या सदस्यांच्या मते, अशी सन्मान्य पदवी किंवा विद्याविषयक विशेषोपाधी मिळण्यास श्रेष्ठ नैपुण्य व स्थान, पात्र व योग्य आहे या कारणावरून त्या व्यक्तीला अशी पदवी किंवा विद्याविषयक विशेषोपाधी प्रदान करण्याबाबत शिफारस केली असेल तर, महापरिषदेस, ठरावाद्वारे, शिफारस केलेल्या व्यक्तीला सन्मान्य पदवी किंवा विद्याविषयक विशेषोपाधी प्रदान करता यावी यासाठी निर्णय घेता येईल.

पदवी किंवा पदविका काढून घेणे.

**४२.** (१) महापरिषदेला, कार्यकारी परिषदेच्या शिफारशीवरून, जर कोणत्याही व्यक्तीला ज्यामध्ये नैतिक अध:पतनाचा अंतर्भाव असेल अशा अपराधाबद्दल न्यायालयाने सिद्धापराध ठरविले असेल तर किंवा ती व्यक्ती अक्षम्य गैरवर्तणुकीबद्दल दोषी ठरली असेल तर, महापरिषदेच्या एकूण सदस्यांच्या बहुमताने आणि महापरिषदेच्या बैठकीत उपस्थित राहून मतदान करणाऱ्या सदस्यांपैकी दोन-तृतीयांशाहून कमी नाही इतक्या सदस्यांच्या बहुमताने

संमत केलेल्या ठरावाद्वारे, अशा व्यक्तीला प्रदान केलेली, किंवा देण्यात आलेली कोणतीही विशेषोपाधी, पदवी, पदविका किंवा विशेषाधिकार काढून घेता येईल.

(२) कोणत्याही व्यक्तीला त्याच्याविरुद्ध करावयाच्या प्रस्तावित कार्यवाहीबद्दल कारणे दाखवण्याची संधी दिल्याखेरीज, पोट-कलम (१) अन्वये, तिच्याविरुद्ध कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही.

(३) महापरिषदेने संमत केलेल्या ठरावाची एक प्रत संबंधित व्यक्तीला तात्काळ पाठविण्यात येईल.

(४) महापरिषदेने घेतलेल्या निर्णयामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीला, असा ठराव प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत कुलपतीकडे अपील करता येईल.

(५) अशा अपिलावरील कुलपतीचा निर्णय अंतिम असेल.

**४३.** (१) कुलगुरु हा, विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांमध्ये शिस्त राखण्यासाठी जबाबदार असलेला अंतिम प्राधिकारी असेल. त्याबाबतीत त्याच्या निदेशांचे विभाग प्रमुख, वसतिगृहे व संस्था यांच्याकडून अनुपालन करण्यात येईल. शिस्त.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, एखाद्या विद्यार्थ्याला परीक्षेला बसण्यास मनाई करण्याच्या किंवा विद्यापीठ किंवा वसतिगृह अथवा संस्था यांमधून काढून टाकण्याच्या शिक्षेबाबत, कुलगुरुचा अहवाल प्राप्त झाल्यावर, कार्यकारी परिषदेकडून त्यावर विचार करण्यात येईल व ती शिक्षा लादण्यात येईल :

परंतु , अशी कोणतीही शिक्षा ही, संबंधित विद्यार्थ्याविरुद्ध करावयाच्या प्रस्तावित कार्यवाहीबद्दल त्यास कारणे दाखविण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज लादण्यात येणार नाही.

**४४.** (१) या अधिनियमाच्या तरतुदींना अधीन राहून, कार्यकारी परिषदेला, तिच्याकडे विहित असलेल्या इतर सर्व अधिकारांशिवाय, विद्यापीठाच्या कामकाजाचे प्रशासन व व्यवस्थापन करण्याकरिता विनियम करण्याचा अधिकार असेल : विनियम.

परंतु , कार्यकारी परिषद, विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाचा दर्जा, अधिकार किंवा रचना यांना बाधा पोहोचविणारे कोणतेही विनियम हे, अशा प्राधिकरणाला, प्रस्तावित बदलांवर लेखी मत व्यक्त करण्याची संधी दिल्याखेरीज करणार नाही, आणि अशाप्रकारे व्यक्त केलेल्या कोणत्याही मतावर, कार्यकारी परिषदेकडून विचार करण्यात येईल :

परंतु , आणखी असे की, विद्यापरिषदेच्या पूर्व अनुमतीखेरीज, कार्यकारी परिषद, पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही बाबींना बाधा पोचविणारे कोणतेही विनियम करणार नाही, त्यात सुधारणा करणार नाही किंवा ते निरसित करणार नाही :—

(एक) विद्यापरिषदेची घटना, अधिकारी व कर्तव्ये ;

(दोन) विद्यापीठातील पाठ्यक्रम व त्यासंबंधातील शैक्षणिक कार्यक्रम याबाबतीत अध्यापनाचे संयोजन करण्यासाठी जबाबदार असलेली प्राधिकरणे ;

(तीन) पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे आणि इतर विद्याविषयक विशेषोपाधी काढून घेणे ;

(चार) विद्याशाखा, विभाग, कक्ष व संस्था स्थापन करणे व बंद करणे ;

(पाच) अधिछात्रवृत्ती, शिष्यवृत्ती, छात्रवृत्ती, प्रदर्शने, पदके व पारितोषिके सुरू करणे ;

(सहा) परीक्षकांच्या नियुक्तीच्या शर्ती व पद्धती किंवा परीक्षा घेणे किंवा त्यांचा दर्जा राखणे अथवा अन्य कोणताही अभ्यास पाठ्यक्रम चालविणे ;

(सात) विद्यार्थ्यांच्या पटनोंदणीबाबतची किंवा प्रवेशाबाबतची पद्धती ;

(आठ) विद्यापीठीय परीक्षांशी समतुल्य म्हणून मान्यता द्यावयाच्या परीक्षा.

(२) विद्यापरिषदेस पोट-कलम (१) च्या खंड (एक) ते (आठ) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सर्व बाबींवर आणि त्यासंबंधातील तदानुषंगिक व तत्संबंधित सर्व बाबींवर विनिमय प्रस्तावित करण्याचा अधिकार असेल.

(३) विद्यापरिषदेने प्रस्तावित केलेल्या विनियमांचा मसुदा कार्यकारी परिषदेने फेटाळल्यास विद्यापरिषदेस कुलपतीकडे अपील करता येईल आणि कुलपतीस, आदेशाद्वारे, असा निदेश देता येईल की, तो प्रस्तावित विनियम महापरिषदेच्या पुढील बैठकीत तिच्या मान्यतेकरिता ठेवता येईल आणि महापरिषदेची अशी मान्यता मिळेपर्यंत, त्या आदेशामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकापासून तो परिणामक असेल ;

परंतु , जर महापरिषदेने अशा बैठकीमध्ये त्या विनियमास मान्यता दिली नाही तर, तो विनियम परिणामकारक असण्याचे बंद होईल.

(४) कार्यकारी परिषदेने केलेले सर्व विनियम, होईल तितक्या लवकर, कुलपतीकडे आणि महापरिषदेच्या पुढील बैठकीमध्ये ठेवण्यासाठी महापरिषदेकडे सादर करण्यात येतील, आणि महापरिषदेस, उपस्थित सदस्यांच्या दोन-तृतीयांशपेक्षा कमी नसतील इतक्या बहुमताने संमत केलेल्या ठरावाद्वारे कार्यकारी परिषदेने केलेला कोणताही विनियम रद्द करण्याचा अधिकार असेल आणि असे विनियम, अशा ठरावाच्या दिनांकापासून परिणामकारक असण्याचे बंद होईल.

विद्यापीठ पुनर्विलोकन आयोग नियुक्त करणे.

**४५.** (१) कुलपतीला, विद्यापीठाच्या कामकाजाचे पुनर्विलोकन करण्याकरिता आणि शिफारशी करण्याकरिता, प्रत्येक पाच वर्षांतून किमान एकदा, एक आयोग घटित करता येईल.

(२) आयोग तीनपेक्षा अधिक नाहीत इतके मान्यवर शिक्षणतज्ज्ञ मिळून बनलेला असेल, त्यांपैकी एक, कुलपतीने राज्य शासनाशी विचारविनिमय करून नियुक्त केलेला, त्या आयोगाचा अध्यक्ष असेल.

(३) सदस्यांच्या नियुक्तीच्या अटी व शर्ती या, कुलपती निर्धारित करील त्याप्रमाणे असतील.

(४) आयोग, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, कुलपतीकडे त्याच्या शिफारशी करील.

(५) कुलपतीस, शिफारशींवर त्यास योग्य वाटेल अशी कार्यवाही करता येईल.

केवळ रचनेमधील दोष, रिक्त पद, इत्यादी कारणांमुळे कार्यवाही विधिअग्राह्य न होणे.

**४६.** (१) महापरिषद, कार्यकारी परिषद, विद्यापरिषद अथवा विद्यापीठाचे अन्य कोणतेही प्राधिकरण किंवा मंडळ हे यथोचितरित्या स्थापन झालेले नसेल अथवा त्याच्या रचनेमध्ये वा पुनर्रचनेमध्ये कोणत्याही वेळी दोष असला तरीही आणि अशा कोणत्याही प्राधिकरणामध्ये किंवा मंडळामध्ये एखादे सदस्याचे पद रिक्त असले तरीही, त्या प्राधिकरणाचे किंवा मंडळाचे कोणतेही कार्य वा अधिनिर्णय वा कार्यवाही ही अशा कोणत्याही कारणावरून अथवा कारणांवरून विधिअग्राह्य होणार नाही.

(२) विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाच्या किंवा मंडळाच्या कोणत्याही सदस्यांवर नोटीस बजावण्याबाबतीतील कोणत्याही अनियमिततेच्या कारणावरून त्याचा कोणताही ठराव विधिअग्राह्य असल्याचे मानले जाणार नाही :

परंतु , अशा अनियमिततेमुळे त्या प्राधिकरणाच्या किंवा मंडळाच्या कामकाजावर बाधक परिणाम झालेला असता कामा नये.

सुरुवातीच्या अडचणी दूर करणे.

**४७.** विद्यापीठाच्या स्थापनेबाबत अथवा विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाच्या पहिल्या बैठकीच्या संबंधात अथवा या अधिनियमाच्या तरतुदी आणि विनियम प्रथमत: अंमलात आणताना अन्यथा, कोणतीही अडचण उद्भवल्यास, कुलपतीस, विद्यापीठाची सर्व प्राधिकरणे स्थापन झालेली असण्यापूर्वी कोणत्याही वेळी, आदेशाद्वारे,

ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनार्थ त्यास आवश्यक वा इष्ट वाटेल अशी, या अधिनियमाच्या तरतुदींशी व विनियमांशी जेथवर सुसंगत असेल तेथवर अशी कोणतीही नियुक्ती किंवा कोणतीही कारवाई करता येईल आणि असा प्रत्येक आदेश, जणू काही ती नियुक्ती किंवा कारवाई या अधिनियमामध्ये व विनियमांमध्ये तरतूद केलेल्या रितीने करण्यात आली होती असे समजून परिणामक होईल :

परंतु , असा कोणताही आदेश काढण्यापूर्वी, कुलपती त्याबाबत खात्री करून कुलगुरूचे आणि स्थापन करण्यात आलेल्या विद्यापीठाच्या समुचित प्राधिकरणाचे मत विचारात घेईल.

**४८.** या अधिनियमामध्ये आणि त्याखाली केलेल्या विनियमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कुलगुरुला कुलपतीच्या पूर्व मान्यतेने आणि निधीच्या उपलब्धततेच्या अधीनतेने, या अधिनियमाच्या तरतुदींचे व विनियमांचे पालन करण्याच्या प्रयोजनार्थ विद्यापीठाची सर्व किंवा कोणतेही कार्य पार पाडता येतील आणि त्या प्रयोजनाकरिता, या अधिनियमाद्वारे व विनियमांद्वारे तरतूद केल्याप्रमाणे विद्यापीठाचे कोणतेही प्राधिकरण अस्तित्त्वात येईपर्यंत अशा प्राधिकरणाने या अधिनियमाद्वारे व विनियमांद्वारे जे अधिकार वापरावयाचे आहेत किंवा जी कार्ये पार पाडावयाची आहेत असे कोणतेही अधिकार वापरता येतील किंवा अशी कोणतीही कार्ये पार पाडता येतील. संक्रमणकालीन तरतुदी.

**४९.** या अधिनियमाला किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही विनियमांना अनुसरून सद्‌भावनेने केलेल्या किंवा केल्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल, विद्यापीठ कुलगुरू, विद्यापीठाची प्राधिकरणे अथवा अधिकारी किंवा अन्य कोणतीही व्यक्ती याच्याविरुद्ध कोणताही दावा, खटला अथवा अन्य कायदेशीर कार्यवाही दाखल करण्यात येणार नाही, आणि त्याच्याकडून कोणत्याही नुकसानभरपाईची मागणी करण्यात येणार नाही. संरक्षण.

**५०.** त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यामध्ये किंवा या अधिनियमाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही कायद्याच्या आधारे परिणामकारक असलेल्या कोणत्याही संलेखामध्ये, या अधिनियमाच्या तरतुदींशी आणि त्याखाली करण्यात आलेल्या कोणत्याही विनियमाशी विसंगत असे काहीही अंतर्भूत असले तरी, ते परिणामक असतील. अधिनियमाचा अधिभावी परिणाम असणे.

**५१.** या अधिनियमामध्ये व विनियमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, ज्या ज्या वेळी विद्यापीठाने कार्यान्वित करावयाची एखादी योजना पुरस्कृत करणाऱ्या कोणत्याही शासनाकडून, विद्यापीठ अनुदान आयोगाकडून अथवा अन्य अभिकरणाकडून विद्यापीठास निधी मिळेल त्या त्या वेळी,— पुरस्कृत योजना.

(एक) विद्यापीठ ती मिळालेली रक्कम विद्यापीठ निधीपासून स्वतंत्र ठेवील आणि त्या योजनेच्या प्रयोजनांकरिताच तिचा विनियोग करील ; आणि

(दोन) योजना कार्यान्वित करण्याकरिता आवश्यक असलेल्या कर्मचारी वर्गाची, पुरस्कर्ता संघटनेने निर्धारित केलेल्या अटी व शर्तींना अनुसरून भरती करण्यात येईल.

**५२.** (१) या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास, **राजपत्रात,** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनांसाठी, त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी, या अधिनियमाच्या प्रयोजनांशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट करता येईल : अडचणी दूर करण्याचा अधिकार.

परंतु , या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षाचा कालावधी समाप्त झाल्यानंतर असा कोणताही आदेश काढता येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५ यांचे निरसन व व्यावृत्ती.

**५३.** (१) महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ अध्यादेश, २०१४ हा, याद्वारे निरसित करण्यात येत आहे. २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश ५.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरीही, उक्त अध्यादेशाद्वारे करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमान्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिती, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

**अनुसूची**

[कलम ३ (१) पहा ]

| विद्यापीठाचे नाव<br>(१) | | विद्यापीठाचे मुख्यालय<br>(२) |
|---|---|---|
| १. महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ, मुंबई | .. | मुंबई. |
| २. महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ, औरंगाबाद | .. | औरंगाबाद. |
| ३. महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ, नागपूर | .. | नागपूर. |

शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे-१

## महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे

* **संचालक,**
  शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय,
  महाराष्ट्र राज्य,
  नेताजी सुभाष मार्ग, मुंबई-४०० ००४.
  दूरध्वनी : ०२२/२३६३२६९३ व २३६३०६९५,
  २३६३११४८, २३६३४०४९.
* **व्यवस्थापक,**
  शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार,
  फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी. पी. ओ. जवळ,
  पुणे - ४११ ००१.
  दूरध्वनी : ०२०/२६१२५८०८, २६१२४७५९.
* **व्यवस्थापक,**
  शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार,
  सिव्हिल लाईन्स,
  नागपूर - ४४० ००१.
  दूरध्वनी : ०७१२/२५६२६१५.
* **सहायक संचालक,**
  शासकीय लेखनसामग्री भांडार व ग्रंथागार,
  शहागंज, गांधी चौकाजवळ,
  औरंगाबाद-४३१ ००१.
  दूरध्वनी : ०२४०/२३३१४६८, २३३१५२५.
* **व्यवस्थापक,**
  शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
  ताराबाई पार्क,
  कोल्हापूर - ४१६ ००३.
  दूरध्वनी : ०२३१/२६५०३९५, २६५०४०२.

**आणि महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते.**